# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 15.05.2019 बुधवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. धंतोली – फसवणुक :**

1) धंतोली – पो.स्टे. धंतोली हद्दीत सिल्वर आर्केट, दुसरा माळा, धंतोली येथील नवोदय अर्बन को ऑप बॅक लिमी. चे सन 2010 ते 2015 दरम्यान कार्यरत संचालक मंडळाचे व बॅकेतील पदाधिकारी व ठरावीक कर्जदार आरोपी इसम यांनी अन्यायाने संगणमत करतांना कर्जदारांना विना कारण कर्ज वाटप केले. कर्जदारांकडे कर्ज थकबाकी असतांना त्यांचे तारण मालमत्तेचे मुळ कागदपत्रे परत केली. कर्जदारांकडे कर्ज थकीत नसल्याचे नाहरकत प्रमाणपत्र दिले. काही कर्जदारांचे नावे बनावट कर्जवाटप करतांना बनावट नोंदीचे कागदपत्र तयार करून ते खरे असल्याचे भासविले. कर्जदारांच्या वादग्रस्त मालमत्ता तारण ठेवून कर्जवाटप केले. बॅकेच्या व्यवस्थापकीय संचालक व इतर पदाधिकारी यांनी स्वतःचे फायदेसाठी बेकायदेशिर रित्या बॅकेतून रकमा उचल केल्याने रिझर्व बॅकेमार्फत बॅकेवर आर्थीक निर्बध लावण्यात आल्यानंतर देखील बॅकेचे आर्थीक व्यवहार सुरू ठेवून नोकरी सोडून गेलेल्या कर्मचारांचे नावाने लॉगींग करून संगणकात फेरफार केली. अशा प्रकारे कृत्य करून सन 2010 ते 2017 दरम्यान बॅकेतील ठेविदारांच्या 38,75,20,641 रू चा अपहार करून ठेवीदारांचा अन्यायाने विश्वासघात करून फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी श्रीकांत श्रीधर सुपे, वय 57 वर्ष, रा. प्लॉट ं. 25, कन्नमवार नगर, वर्धा रोड, सोनेगांव, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. धंतोली येथे पोहवा दिनेश काकडे, 9823350016 यांनी आरोपींविरूध्द कलम 406,409,420,120(ब),465,467,468,471,477(अ) भादंवि सहकलम 3 एम.पी.आय.डी ॲक्ट, सहकलम 65,66(ब) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

2) धंतोली – दिनांक 01.01.2019 चे 1455 वा ते 1630 वा चे दरम्यान फिर्यादी कु. शुभांगी मनोहर अतकरी, वय 25 वर्ष, रा. प्लॉट नं. 16, हावरा पेठ, शुक्ला नगर, रामेश्वरी रिंग रोड, नागपूर ही पो.स्टे. धंतोली हद्दीत फॉर्च्युन मॉल, मुंजे चौक, नागपूर येथे असतांना अज्ञात इसमाने फिर्यादीला फोन करून पेटीएम के.वाय.सी करून देण्याचे सांगून आरोपीने फिर्यादीकडून बॅकेची माहीती विचारून घेवून फिर्यादीचे 46,500 रू खोटे बोलून लुबाडून आर्थीक फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. धंतोली येथे पोहवा दिनेश काकडे 9823350016 यांनी आरोपीविरूध्द कलम 420,419 भादंवि, सहकलम 66,66(सि),66(डी) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. हिंगणा – प्राणांतीक अपघात :**

दिनांक 12.05.2019 चे 1125 वा ते 1140 वा दरम्यान आरोपी श्रीराम पतीराम वरकाडे, वय 52 वर्ष, रा. मांडवा, तह. हिंगणा, जि. नागपूर याने आपल्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच/40/बी.आर/4090 ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून पो.स्टे. हिंगणा हद्दीत मौजा कान्होलीबारा रोड, गोंडवाणा, हिंगणा, नागपूर येथे कान्होलीबारा कडे जात असलेल्या मोटारसायकल क्र. एमएच/35/ए.सी/8266 ला समोरून धडक दिल्याने त्या मोटारसायकल वरील चालक नरेश रमेश खरोले, वय 31 वर्ष, रा. पालखेडा, तह. गोरेगांव, जि. गोंदीया हे मागून येणारी मेस्ट्रो मोपेड क्र. एमएच/40/बी.पी/3350 वर पडल्याने मोपेड चालविणारे कृष्णा सिताराम सुरणकर, वय 47 वर्ष, व त्यांचे मागे बसलेल्या त्यांची पत्नी जीजाबाई सुरणकर, वय 45 वर्ष, यांना व स्वतः जखमी करण्यास तसेच एमएच/35/ए.सी/8266 चे चालक नरेश रमेश खरोले, यांचे मरणास कारणीभुत झाला.

याप्रकरणी पो.स्टे. हिंगणा येथे सपोउपनि अनील धानोरकर, 9422104287 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,337,338,304(अ) भादंवि सहकलम 184 मपोका अन्वये गुन्हा नोंदवीला आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**1) पो.स्टे. गणेशपेठ, एमआयडीसी, सक्करदरा :**

**1) गणेशपेठ** – दिनांक 15.05.2019 चे 1000 वा चे सुमारास अंदाजे 50 ते 55 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. गणेशपेठ हद्यीत कृषी औद्योगीक संघ बिल्डींगचे पाठीमागे मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी अनील वासुदेव कुराडे, वय 40 वर्ष, रा. लालगंज गुजरी, मस्कासाथ, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे पोउपनि एस.आर. गजभारे, 9764144007 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**2) एमआयडीसी** – दिनांक 09.05.2019 चे 1530 वा चे सुमारास पो.स्टे. एमआयडीसी हद्यीत खड्डा कंपनी, एम.आय.डी.सी. नागपूर येथे राहणारे मोतीलाल त्रिवेदी यादव, वय 50 वर्ष, यांची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता वेलट्रीट हॉस्पीटल वाडी येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी पो.स्टे. वाडी येथून आलेल्या 00/19 चे कायमीवरून व फिर्यादी धनंजय मोतीलाल यादव, वय 29 वर्ष, रा. सावजी फाटा, एक्सल कंपनी, भंडारा रोड, हल्दीराम जवळ, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. एमआयडीसी येथे पोउपनि मदनकर, 9881308011 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**3) सक्करदरा** – दिनांक 15.05.2019 चे 0800 वा चे सुमारास पो.स्टे. सक्करदरा हद्यीत मोठा ताजबाग, पप्पु पहेलवानचे घराजवळ, नागपूर येथे राहणा–या बुलकशहॉ अंजुम मोहम्मद अजहर परविन, वय 30 वर्ष, या आपल्या घरी फरशी पुसत असतांना त्यांच्या हातातील पोछा सुरू असलेल्या कुलरला लागल्याने त्यांना करंट लागला. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरानी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. सक्करदरा येथे पोउपनि मात्रे, 8552911900 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

## (ईतर)

**1) पो.स्टे. यशोधरानगर हद्यीतील चामा गॅगचा टोळीप्रमुख कुख्यात गुं मोबीन अहमद वल्द समसुद्यीन अहमद वय 30 वर्ष, रा. टिपु सुलतान चौक, नागपूर याने शासकीय पोलीस वाहनाचा वापर करून टिक टॉक या सोशल मिडीयावर के.जी.एफ. सिनेमातील डॉनची डायलॉगची क्लीप तयार करून दुरपयोग केल्याबाबत :**

पो.स्टे. यशोधरानगर हद्यीत टिपु सुलतान चौक, नागपूर येथे राहणारा कुख्यात गुंड मोबीन अहमद वल्द समसुद्यीन अहमद, वय 30 वर्ष, यास मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. 5, नागपूर शहर यांनी नागपूर शहरातून दोन वर्षाकरीता हद्यपार केले. मोबीन अहमद वल्द समसुद्यीन अहमद याचेविरूध्द सन 2010 पासून गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून याआगेदर सुध्दा सन 2012 मध्ये त्यास हद्यपार करण्यात आले होते. त्याने आपले गुन्हे करणे सुरूच ठेवल्याने त्याचेविरूध्द एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत प्रतीबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. स्थानबध्दतेतून रिहा झाल्यानंतर त्याने पुन्हा आपली चामा गॅग नावाची टोळी सक्रीय करून गुन्हे करण्यास सुरूवात केली असता मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. 5 नागपूर शहर यांचे आदेशान्वये त्यास 2 वर्षाकरीता नागपूर शहरातून हद्यपार करण्यात आले असता तो स्वतःला लपवून हद्यपार आदेशाची बजावणी करण्यास टाळाटाळ करीत होता. यशोधरानगर पोलीसांनी त्याचा बरेच ठिकाणी व ज्या ज्या ठिकाणी तो येत जा करीता असतो त्याचे मित्रमंडळी नातेवाईकांकडे शोध घेण्याच्या प्रयत्न करीत होते परंतु तो मिळून येत नव्हता.

दरम्यान काळात त्याने टिक टॉक या सोशल मिडीयावर के.जी.एफ. या सिनेमांवर आधारीत पोलीस स्टेशन कोराडी समोरील उभ्या असलेल्या शासकीय पोलीस वाहनांवर के.जी.एफ सिनेमाच्या डॉनच्या डायलॉगच्या अनुषंगाने शुटींग करून व्हिडीयो टाकले होते. सदरचे व्हिडीयो सोशल

मिडीयावर व्हायरल तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन कोराडी येथे कलम 447 भादंविचा गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आलेला आहे.

आज दिनांक 15.05.2019 रोजी पो.स्टे. यशोधरानगर पोलीसांनी मोबीन अहमद यास ताब्यात घेतले असून त्यास पोलीस स्टेशन कोराडी येथील कलम 447 भादंवि मध्ये पुढील कार्यवाहीस्तव कोराडी पोलीसांच्या ताब्यात दिलेले असून कोराडी पोलीसांनी त्यास व नमुद गुन्हयामध्ये अटक केलेली आहे. तसेच त्यास मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. 5, नागपूर शहर यांनी जारी केलेला हद्दपार आदेश बजावणी करून तो वर नमुद गुन्हयातून जामीनावर सुटताच नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाबाहेर निघून जाण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

चामा गॅग टोळीप्रमुख मोबीन अहमद यांचेविरूध्द पो.स्टे. यशोधरानगर व कळमना येथे लोकांना दमदाटी व मारहान करणे गैरकायद्याची मंडळी जमवून आपखुशीने दुखापत करणे गैरकायद्याची मंडळी जमवून अश्लिल शिवीगाळ करून अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, आपखुशीने घातक शस्त्राने गंभीर दुखापत करणे, व नुकसान करणे, आपखुशीने घातक शस्त्राने दुखापत करणे, जिवानीशी खुन करण्याचा प्रयत्न करणे, जबरी चोरी करणे, शांतताभंग करण्याचे उद्येशाने अपमान करणे, नुकसान करणे, घातक शस्त्रे घेवून फिरणे, मनाई व हद्दपार आदशाचे उल्लघंन करणे, पशु संरक्षण अधिनीयम व प्राण्यांचा छळा प्रतिबंधक अधिनियमांचे अंतर्गत गुन्हे करणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. 5 श्री हर्ष पोद्यार यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. यशोधरानगर नागपूर शहर येथील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

**2) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–**

नागपूर शहरात आज दि. 15.05.2019 रोजी मा. पोलीस उपायुक्त, (परि क्र. 3) श्री राहुल माकणीकर, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर

## प्रेसनोट

अमरावती –वाडी खडगाव टि पॉईन्ट ते वाडी – खडगाव गावापर्यंत मार्गाचे (2.5 कि. मी.) पर्यत या दरम्यान सिमेंट रोडचे उजव्या बाजुचे सिमेंटीकरणाचे काम द्रिष्टी स्ट्रक्चरल इंजिनियरींग प्रा. लि. नागपूर या कंपनीव्दारे 120 दिवसात पुर्ण करण्यात येणार आहे. सदरच्या रस्त्यावर दिवसभर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता , अमरावती –वाडी खडगाव टि पॉईन्ट ते वाडी – खडगाव गावापर्यंत मार्गाचे (2.5 कि. मी.) पर्यत (उजवी बाजु) या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन दिनांक 15/05/2019 अन्वय खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित केली आहे.

**अमरावती –वाडी खडगाव टि पॉईन्ट ते वाडी – खडगाव गावापर्यंत मार्गाचे (2.5 कि. मी.) पर्यत (उजवी बाजू) दरम्यान मार्गावरील वाहतूक बंद करण्यात येत आहे.**

नमुद रोडवरील वाहतूक अमरावती –वाडी खडगाव टि पॉईन्ट ते वाडी – खडगाव गावापर्यंत मार्गाचे (2.5 कि. मी.) पर्यत दरम्यान असलेल्या रोड दुभाजकाचे डावी कडील एका बाजुने दुतर्फा जाईल.

**सदर अधिसुचना दि. 17 .05.2019. ते दि. 16.06..2019 पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

<u>मा. सह पोलीस आयुक्त श्री रविंद्र कदम यांचे आदेशान्वये</u>